## क्रिकेटचा महाकुंभमेळा; अर्थव्यवस्थेला गती

खरं म्हणजे, ट्वेन्टी-२० क्रिकेटची वाढती लोकप्रियता, गेल्या काही काळात कसोटी क्रिकेटला लाभलेली नवसंजीवनी यामुळे एकदिवसीय क्रिकेटचे महत्त्व कमी होत असल्याची भीती आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद, आजी-माजी खेळाडू आणि काही चाहत्यांमध्ये व्यक्त होत होती. अशा वेळी क्रिकेटवेड्या भारतात विश्वचषक स्पर्धा आयोजित होणे, हे एकदिवसीय क्रिकेटच्या भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरू शकेल. एका बाजूला आशिया चषकावर भारतीय संघाने नाव कोरल्यानंतर आशियाई क्रीडा स्पर्धांमध्येही भारताचा दबदबा वाढत असतानाच व या स्पर्धा ऐन रंगात आलेल्या असतानाच देशात एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा होत आहेत. अशा विविध स्पर्धांची रेलचेल सुरू असल्याने यंदा विश्वचषक स्पर्धेबाबत तितकीशी चर्चा झालेली नव्हती. त्यामुळे विश्वचषकासाठीचा माहोल म्हणावा तसा तयार झालेला नाही. मात्र भारतामध्ये क्रिकेट स्पर्धेबाबत चर्चा होण्यासाठी एखादा सामनाही पुरेसा ठरतो. त्यामुळे अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गतविजेता इंग्लंड आणि उपविजेत्या न्यूझीलंड या तुल्यबळ संघांतील पहिला सामना अपेक्षेप्रमाणे चुरशीचा झाला, तर विश्वचषकाबाबत चाहत्यांमध्ये असलेली उत्सुकता निश्चित वाढेल, हे निश्चित. विशेष म्हणजे २०११ नंतर प्रथमच भारतात एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेचे आयोजन केले जात आहे. त्यावेळी भारताने सह-यजमानपद भूषवतानाच विश्वचषकाचे जेतेपद मिळवले होते. मात्र, त्यानंतरच्या १२ वर्षांत भारताला 'आयसीसी'ची केवळ एक (२०१३मध्ये चॅम्पियन्स करंडक) जागतिक स्पर्धा जिंकता आली आहे. २०११मध्ये भारतीय संघ विजयी ठरल्यानंतर २०१५मध्ये ऑस्ट्रेलिया आणि २०१९मध्ये इंग्लंडने मायदेशात एकदिवसीय विश्वचषकाचे जेतेपद मिळवले होते. आता यजमान भारताचा संघही या स्पर्धेवर वर्चस्व गाजवणार का आणि गेल्या दशकभरापासूनचा जागतिक जेतेपदाचा दुष्काळ संपवणार का, हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरणार आहे. गेल्या २०१९च्या स्पर्धे प्रमाणे यंदाच्या विश्वचषकातही १० संघांचा समावेश असून सर्व संघ एकमेकांविरुद्ध साखळी सामने खेळणार आहेत. साखळी सामन्याअंती गुणतालिकेत अव्वल चार स्थानांवर असणारे संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. त्यानंतर अंतिम सामनाही अहमदाबाद येथे १९ नोव्हेंबरला खेळवला जाणार आहे. मात्र, त्यापूर्वीच्या सामन्यांत सर्वच संघांमध्ये चुरस असेल हे निश्चित. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय अर्थव्यवस्था सुसाट वाटचाल करत आहे. त्यातच आता आगामी ४६ दिवस भारतीय अर्थव्यवस्थेला आणखी चालना देणारे ठरणार आहेत. कारण या ४६ दिवसांत एकदिवसीय क्रिकेट वर्ल्डकपचे सामने रंगणार आहेत व या दिवसांत फार मोठ्या आर्थिक उलाढाली होणार असल्याने जणू पैशांचा पाऊस पडणार आहे. तब्बल १२ वर्षांनंतर भारतीय खेळपट्ट्यांवर वनडे विश्वचषकाचे आयोजन केले आहे. यावेळी या वर्ल्डकप स्पर्धा फक्त क्रिकेटप्रेमींसाठी मनोरंजनच नाही तर देशाच्या अर्थव्यवस्थेलाही चालना देणार आहेत. यंदाच्या वर्ल्ड कपमध्ये टीम इंडियाचे कर्णधारपद रोहित शर्मा सांभाळणार आहे. रोहितची वर्ल्ड कपमध्ये कर्णधार म्हणून ही पहिलीच वेळ आहे. बाबर आझम पाकिस्तानचे नेतृत्व करेल. अनुभवी ऑलराउंडर शाकिब अल हसन बांगलादेशचे कर्णधारपद सांभाळणार आहे. हशमतुल्लाह शाहिदी अफगाणिस्ताची कॅप्टन्सी करेल. दासून शनाका श्रीलंकेला वर्ल्ड कप जिंकून देण्याचा प्रयत्न करेल. ऑस्ट्रेलियाची सूत्र पॅट कमिन्स याच्याकडे आहेत. दक्षिण आफ्रिका टीम टेम्बा बावुमा यांच्या नेतृत्वात भारतात वर्ल्ड कप खेळेल. न्यूझीलंड गेल्या वेळेस उपविजेता होती. त्यामुळे केन विल्यमसन याचे आपल्या कर्णधारपदात न्यूझीलंडला वर्ल्ड चॅम्पियन करण्याचा प्रयत्न असेल. गतविजेता इंग्लंडसमोर वर्ल्ड कप राखण्याचे आव्हान असेल. आता या १० संघांपैकी कोणती टीम वर्ल्ड कप उंचावणार हे ४६ व्या दिवशीच स्पष्ट होईल. दरम्यान गेल्या १२ वर्ल्ड कपनंतर यंदा पहिल्यांदाच वेस्ट इंडिज स्पर्धेत नसणार आहे. त्यामुळे यंदा निश्चितच क्रिकेट रसिकांना विंडिजची उणीव भासणार इतके निश्चित. एकूणच क्रिकेटवेड्या भारतात महाकुंभमेळ्याचा थरार सुरू झाला असून देशभरातील वातावरण क्रिकेटमय झालेले असेल.

# बचतीतील चिंताजनक घसरण

**२०१० मध्ये भारतीय नागरिकांच्या एकूण उत्पन्नाच्या ३७% बचतीत जमा होत होते. म्हणजेच शंभर रुपये कमावणाऱ्या नागरिकांच्या कमाईतून ३७ रुपये सरासरी बचत होत होती. नुकत्याच जाहीर झालेल्या राष्ट्रीय बचतीच्या आकडेवारीवरून ही बचत भारताच्या राष्ट्रीय सकल उत्पन्नाच्या ५.१% वर घसरली आहे. त्याची कारणे पुढीलप्रमाणे दिसून येतात.**

१)लोकसंख्या वाढ व त्यामुळे झालेली रोजगाराची घसरण

दक्षिण भारतीय राज्यात लोकसंख्या वाढ जरी नियंत्रणात आली असली तरी अजूनही उत्तर भारतातील लोकसंख्या वाढीच्या उद्दिष्टाप्रमाणे नियंत्रण आलेले नाही, लोकसंख्या वाढीमुळे रोजगार कमी होतात तसेच असलेल्या रोजगारातील वेतन कमी होते. रोजगाराचा अभाव व कमी वेतन याचा भारतीय बचतीवर गेल्या पंधरा वर्षात मोठा परिणाम झाला आहे

२) महागाई व जीएसटी

पंधरा वर्षात महागाईत प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे . त्यामानाने वेतनात वाढ न झाल्यामुळे बचतीचे प्रमाण कमी झाले आहे.जीएसटीमुळे प्रत्येक व्यक्ती खरेदी करत असलेल्या जीवनावश्यक सर्व गोष्टींवर असलेल्या १५ ते २० टक्के इतका मोठा उत्पन्नातील वाटा जीएसटीत खर्च होत आहे. कौटुंबिक खर्च दहा हजार असणाऱ्या कुटुंबाच्या उत्पन्नातील दीड ते दोन हजार रुपये जीएसटी वर खर्च होत असतात.

३) मोबाईल खरेदी व मोबाईलचा मासिक खर्च

वीस वर्षांपूर्वी कुटुंबात कोणाही कडे नसलेले मोबाईल आता कुटुंबातील सर्व व्यक्तींकडे आहेत. त्यामुळे मोबाईल हँडसेट खरेदी तसेच दर महिन्याला मोबाईल बिलाच्या खर्चामुळे कुटुंबातील बचतीचे प्रमाण कमी झाले आहे.

४)टू व्हीलर व फोर व्हीलर खरेदी व इंधनावरील खर्च

वीस वर्षात भारतातील टू व्हीलर व फोर व्हीलर वाहनांच्या वापरांमध्ये दहा पटीने वाढ झाली आहे. बहुतेक कुटुंबाकडे दुचाकी तर समाजातील २० टक्के लोकांकडे चार चाकी (फोर व्हीलर) वाहने आता आहेत. त्यामुळे वाहन खरेदी तसेच इंधन खर्चात झालेल्या वाढीमुळे कुटुंबातल्या उत्पन्नातील मुख्य हिस्सा वाहन खरेदी व इंधन खर्चात खर्च होतो आहे.

५) स्वस्त झालेली स्वस्त झालेली गृह कर्ज व घर खरेदी

भारत सरकारच्या अनेक योजनांमुळे तसेच स्वस्त झालेल्या गृह कर्जामुळे गृह खरेदीचे प्रमाण ग्रामीण व शहरी भागात खूप प्रमाणावर वाढले आहे. त्यामुळे कुटुंबाच्या एकूण उत्पन्नापैकी २५% पासून ते ६०% पर्यंत गृह कर्जावर खर्च होत आहे. त्यामुळेकं बचतीचे प्रमाण कमी झाले आहे

६) शहरातील स्थलांतर

पंचवीस वर्षात ग्रामीण भागातील दुष्काळ तसेच जमिनीचे तुकडे पडल्यामुळे शेतीवर आधारित अर्थव्यवस्थेवर झालेले परिणाम तसेच रोजगाराचा अभाव यामुळे ग्रामीण भागातून शहरात स्थलांतराचे प्रमाण खूप वाढले आहे. त्यामुळे कौटुंबिक खर्चात वाढ होऊन स्थलांतरित लोकांच्या बचतीत घट झाली आहे.

७) ऑनलाइन व अनावश्यक खरेदी

२५ वर्षांपूर्वी बाहेरून जेवण मागवणे किंवा बाहेर जाऊन जेवणे हे जवळजवळ भारतीय कुटुंब व्यवस्थेत नव्हते .आता शहरात मध्यमवर्गीय तसेच उच्च मध्यमवर्गीय कुटुंबांमध्ये बाहेरून जेवण मागवणे तसेच हॉटेलमध्ये जाऊन जेवणे याचे प्रमाण वाढल्यामुळे , ऑनलाइन अनावश्यक खरेदी वाढल्यामुळे भारतीय बचतीवर परिणाम झाला आहे.

८) इंग्रजी माध्यमाचे शिक्षण

१९९० नंतर इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणात फार मोठ्या प्रमाणावर वाढ झाली .महाराष्ट्रात इंग्रजी माध्यमाच्या शाळांना अनुदान मिळत नाही .आता ग्रामीण व शहरी भागातील इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या मुलांचे प्रमाण ५०% पर्यंत झालेले आहे .त्यामुळे कुटुंबातील उत्पन्नाचा पंचवीस टक्के पेक्षा जास्त भाग मुलांच्या इंग्रजी माध्यमाच्या फी देण्यात जातो. याचा फारच मोठा परिणाम कुटुंबाच्या बचतीवर झाला आहे.

१०) व्यावसायिक शिक्षणात झालेली वाढ

मागील वर्षी संपूर्ण भारतातून १५ लाखापेक्षा जास्त तरुण-तरुणींनी अभियांत्रिकी पदवी मिळवली तर औषध निर्माण शास्त्र , आर्किटेक्ट एमबीए ,पॉलिटेक्निक, वैद्यकीय शिक्षण या सहित सर्व व्यावसायिक शाखा मिळून दरवर्षी दहा लाख विद्यार्थी उत्तीर्ण होतात. या १ कोटी व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन शिक्षणावर होत असलेल्या खर्चामुळे भारतीय बचतीवर मोठाच परिणाम झालेला आहे.

१०) परदेशी शिक्षण

मागील वर्षी संपूर्ण भारतातून बारा लाखापेक्षा जास्त विद्यार्थी जगभरातील विविध विद्यापीठात शिक्षणाकरता गेले . परदेशी शिक्षणाकरता शिक्षणाची फी व राहण्याची व्यवस्था मिळून सरासरी तीस लाख रुपये वार्षिक खर्च येतो .मागील वर्षी गेलेल्या विद्यार्थ्यांनी पाच लाख कोटी रुपये परदेशात शिक्षणासाठी खर्च केले. दोन किंवा तीन वर्षाच्या शिक्षणासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांची फी एकत्रित केल्यास भारतातून मागील वर्षी ९ लाख कोटी रुपये परदेशी शिक्षणावर खर्च झाले .भारत सरकार व भारतातील सर्व राज्यांचा शिक्षणाचा खर्च एकत्रित केला तरी त्यापेक्षा जास्त खर्च भारतीय विद्यार्थ्यांनी परदेशी शिक्षणावर खर्च केला आहे .अर्थात परदेशात मिळणाऱ्या उत्तम नोकऱ्या त्या मागील आकर्षण आहे. सर्वच विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळतात असे नाही.



शब्द संवाद
प्राचार्य प्रशांत पाटील
(नाशिक) मो.९५११८५९९३९

११)दारू व सट्टयाचे व्यसन

भारतात अधिकृत आकडेवारीनुसार दरवर्षी दारूच्या खपात वाढ होत आहे .सुरुवातीला ऑफलाइन असलेल्या सट्टा आता ऑनलाईन झाला आहे. दारू आणि सट्टा यात बऱ्याच कुटुंबातील उत्पन्नातील मोठा हिस्सा खर्च होतो. त्यामुळे कर्ज वाढते .कुटुंब व्यवस्थेवर परिणाम होतो . याचा कर्ज वाढीवर व बचतीवर याचा फार मोठा परिणाम होतो.

१२) शहरी तसेच ग्रामीण भागात बँकिंग तसेच नॉन बँकिंग क्षेत्रातील अति सुलभ कर्ज वाटप

शहरात तसेच ग्रामीण भागात बँकिंग तसेच नॉन बँकिंग कर्ज मिळणे फार सोपे झाल्यामुळे संपूर्ण भारतातील कर्जात प्रचंड मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. मायक्रो फायनान्सने तर ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था उध्वस्त केली आहे .क्रेडिट कार्ड तसेच विविध पच्या माध्यमातून मिळणाऱ्या कर्जामुळे व त्यावरील मध्ययुगीन व्याज पद्धतीने मुळे संपूर्ण कुटुंब व्यवस्था कर्जबाजारी होऊन बचत तर जाऊ द्या पण जगणे सुद्धा लोकांना अवघड झाले आहे.

१४) पोस्ट ,बँक , एलआयसी यांचे घसरलेले व्याजदर

पूर्वी १२ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त परतावा देणाऱ्या अनेक योजना पोस्ट, एलआयसी, सरकारी व खाजगी बँकांकडे होत्या .*गेल्या पंधरा वर्षात बचतीवर मिळणाऱ्या व्याजात सातत्याने घसरण होऊन हे प्रमाणात सहा ते नऊ टक्के पर्यंत घसरले आहे. शिवाय त्यातून मिळणाऱ्या व्याजावर आयकर आकारणी होते. त्यामुळे महागाईच्या दरापेक्षा बचतीवर मिळणारे उत्पन्न कमी झाल्यामुळे लोकांचे पारंपरिक बचतीवर परतावा देणाऱ्या योजनांकडे आकर्षण कमी झाले आहे. विविध कारणांमुळे कुटुंबावरील कर्ज खूप मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. *वीस वर्षांपूर्वी नसलेले खर्च वाढले आहेत. खर्च करण्याची वृत्ती वाढली आहे. प्रगत देशातील कमवा व लगेच खर्च करा, उद्याची चिंता करू नका ही वृत्ती भारतात वाढते आहे. महागाई वाढली आहे. त्यामुळे बचतीचे प्रमाण २०१० या वर्षात अधिकृत आकडेवारीनुसार ३७ रुपये होते. ते या वर्षी दहा रुपयांपर्यंत घसरले आहे.

स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारतातील सरासरी वयोमान ३५ वर्षे होते. भारतातील अधिकृत आकडेवारीनुसार ते आता ७२ वर्ष झाले आहे .साठ वर्षानंतर ८० ते ९० वर्ष जगण्यापर्यंत लोकांचे प्रमाण वाढले आहे .त्यामुळे बचत नसेल तर उर्वरित आयुष्य लोक कसे जगू शकतील हा मोठा प्रश्न आहे.

कमी बचतीमुळे आरोग्य, शिक्षण, उत्तम जगणे ,निवृत्तीवेतन या सर्वच गोष्टींवर फार मोठा प्रमाणावर परिणाम झालेला आहे . कोविड मुळे बंद असलेला रोजगार व उद्योगधंदा मुळे भारतीयांची बचत मोठ्या प्रमाणावर आटली.

बचतीच्या सारख्या घसरणीवर समाजातील सर्व लोकांनी ,धोरणकर्त्यांनी फार गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकताच निर्माण झाली आहे.

## आयकर विवरणपत्रावरील प्रक्रिया आणि परतावा

करपात्र मर्यादेहून अधिक उत्पन्न असलेल्या सर्व नागरिकांचे आयकर विवरणपत्र भरणे हे कर्तव्य आहे, त्याचप्रमाणे कायद्याने ते सक्तीचे आहे. याशिवाय अधिकाधिक लोकांनी विवरणपत्र भरून आपले सर्व मार्गांनी मिळणारे उत्पन्न जाहीर करावे यासाठी मुळातून कर कपात (टीडीएस) केली जाते. यामधील ज्यांचे सर्व मार्गांने मिळणारे उत्पन्न, मिळणाऱ्या करसवलती वजा करता ते करपात्र मर्यादेहून कमी असल्यास त्यांचा कर परत करण्यात येतो. अधिक उत्पन्न असल्यास कर भरावा लागतो.

खरं तर पॅन आणि आधार याशिवाय कोणतेही मोठे व्यवहार होऊ शकत नाहीत. म्हणूनच आता मुळातून करकपातीची (टीडीएस) खरोखरच गरज नाही. यात अनेक ज्ञानी-अज्ञानी ससलोक कर देय नसताना, त्यांच्या छोट्या-मोठ्या परताव्याची मागणी करत नाहीत. तो कर सरकारकडे जमा होतच असतो. योग्य कर भरणे हे जसे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे त्याच नियमाने कर देय नसलेल्या लोकांचा कर केवळ त्यांनी मागणी केली नाही म्हणून तो सरकारने आपल्याकडे ठेवणे हे नैतिकतेला धरून नाही. त्यामुळे मुळातून





करकपात (टीडीएस) ही संकल्पना आता पूर्णपणे बाद करायला हवी. करपात्र उत्पन्न नसलेल्या व्यक्तींना परतावे देण्यात आयकर खात्याचे अनेक मानवी तास वाया जात आहेत. तेच मानवी तास कर चुकवेगिरी करणाऱ्यांचा शोध घेण्यासाठी वापरले गेले पाहिजेत.

आयकर विवरणपत्र अपलोड केल्यावर त्यास करदात्याने त्यातील माहिती बरोबर असल्याचे प्रमाणित करावी लागते, तेव्हाच करदात्याच्या बाजूची प्रक्रिया पूर्ण होते. सर्वसाधारणपणे त्यात दिलेली माहिती खरी आहे असे गृहीत धरून त्याची वरवर तपासणी केली जाते आणि त्यास मान्यता दिली जाते. काही विवरणपत्रे कोणताही निकष न लावता कॉम्प्युटरद्वारे सखोल छाननीसाठी नमुन्यादाखल काढली जातात. यावर्षी सन २०२३-२०२४ साठी सर्वाधिक म्हणजे ६ कोटी ७७ लाख विवरणपत्र ३१ जुलै २०२३ रोजी म्हणजेच टॅक्स ऑडिट न करता विवरणपत्र भरण्याच्या अंतिम तारखेपर्यंत सादर करण्यात आली. विवरणपत्र भरण्यात झालेली वाढ ही आधीच्या वर्षाच्या तुलनेत १६.१% अधिक आहे. यातील ५३.६७ लाख करदाते प्रथमच विवरणपत्र भरत आहेत. यापूर्वी सरकारकडून दंडाशिवाय आयकर विवरणपत्र भरण्याची अंतिम तारीख काहीतरी कारणाने वाढवून दिली जात असे. सन २०२२ मध्ये प्रथमच अशी मुदतवाढ न दिल्याने यावर्षी ३१ जुलै २०२३ रोजी एकाच दिवशी सर्वाधिक म्हणजे ६४.३३ लाख विवरणपत्रे भरली गेली. यामुळे करदात्यांच्या संख्येत वाढ झाली अशी सरकारची समजूत आहे.

करदात्यांनी विवरणपत्र भरून दिल्यावर त्यास मान्यता देण्याची, परतावे पाठवण्याची आणि अधिक कराची मागणी करण्याची प्रक्रिया आयकर विभागाकडून केली जाते. त्याप्रमाणे कलम १४३ (१) नुसार करदात्यास मेल केला जातो. असा मेल आला, त्यात परतावा किंवा मागणी नसेल तर मान्यता मिळाली आहे, परतावा मिळेल असे सूचित केलेले असते तर मागणी केलेला कर विहीत मुदतीत भरल्यास पूर्ण झाली समजण्यात येते. ही मुदत संपल्यावर नियमानुसार दंड द्यावा लागतो. ही प्रक्रिया करताना विभागास येणाऱ्या सर्वसाधारण अडचणींबाबत ४ सप्टेंबर २०२३ रोजी एक पत्रक काढले. त्यात त्यांचे प्रामुख्याने विभागास येणाऱ्या अडचणींचे तीन प्रकारात वर्गीकरण करण्यात आले आहे.

विवरणपत्र प्रमाणित न करणे : विभागाकडे आलेल्यांतील १४ लाख विवरणपत्र करदात्याने प्रमाणित न केल्याने बाकी आहेत. करदात्यांनी विवरणपत्र भरून झाल्यावर त्याचे पुष्टीकरण करणे अपेक्षित आहे, असे न केल्यास त्यावर प्रक्रिया होऊ शकत नाही. विवरणपत्र प्रमाणित करण्यास पूर्वी १२० दिवसांचा अवधी मिळत असे, तो आता ३० दिवसांवर आणला आहे. विवरणपत्र अपलोड केल्यावर त्याचे ३० दिवसांत पुष्टीकरण न केल्यास त्या आर्थिक वर्षाचे विवरणपत्र भरलेच नाही असे समजण्यात येते.


विभागाने मागितलेली माहिती सादर न करणे -

जी विवरणपत्र तपासणीसाठी येतात किंवा विभागाच्या दृष्टीने सखोल चौकशीच्या कक्षेत असतात त्याच्याकडून त्याने दिलेल्या माहितीचे पुरावे आवश्यकतेनुसार मागितले जातात. करदात्यांना मेल करून सदर गोष्टींची सॉफ्ट कॉपी मेलद्वारे पाठवावी लागते. अनेकदा करदाते त्याकडे दुर्लक्ष करतात. यावर्षी १२ लाख लोकांकडून अशी माहिती विभागाने मागवली असून ती खालील स्वरूपाची असू शकते. उदाहरणार्थ,

आयकर खाते योग्य रीतीने भरलेल्या विवरणपत्रावर तत्परतेने प्रक्रिया करून ते मान्य करण्यास, परतावा देण्यास किंवा कराची मागणी करण्यास सक्षम असून यावर्षी म्हणजेच सन २०२३-२०२४ या वर्षासाठी दाखल झालेल्या ८८% विवरणपत्रांवरील प्रक्रिया पूर्ण झाली असून २.४५ कोटी परतावे करदात्यांना देऊन झाले आहेत. हा एक विक्रम असून विवरणपत्र मान्य करण्याचा किंवा परतावा मिळण्याचा सरासरी कालावधी जो सन २०१९-२०२० रोजी ८८ दिवस होता तो आता केवळ १० दिवसांवर आला आहे.

**- उदय पिंगळे: मुंबई ग्राहक पंचायत**

## शब्दकोडे-१९८



**आडवे शब्द**

१. दृष्टीभेट २. योग्य उपयोग ८. पूजाअर्चेचे काम करणारा १०. नड ११. सापाचे-इंगळीचे चावणे १३. अखबार १६. समशेर १८. साठ मिनिटे १९. डोळ्यावर आलेली झोपेची गुंगी २०. पोपट २२. कौसल्यापुत्र २४. ठाण्याचा रहिवासी २६. वर्तमानपत्रातील कप्पा २८. माफी २९. संगीतातील एक राग ३१. सहाय्य ३२. प्रतीक ३५. सर्वस्व ३८. गेरू ३९. समशीतोष्ण ४०. हत्तींच्या कळपाचा प्रमुख ४२. थरथरणारा आवाज ४३. एकूण एक, सर्व ४४. वालुकामय जमीन ४६. दुर्लक्ष ४८. पक्षाघात ५०. घरातील मोठी मंडळी ५२. परमेश्वर ५४. अंत:करणपूर्वक ५५. विरोध ५७. प्रार्थना, उपासना ५९. विजयाची घोषणा ६२. शाहीराजवळचे चर्मवाद्य ६३. पद्धत ६४. दहाचा संच ६६. एक संत ६८. प्रसिद्धीपत्रक ७०. अस्सल, निर्भेळ ७१. स्त्री ७२. आवाज, गोंगाट ७३. सापाने टाकलेली त्वचा ७४. स्वयंपाकाचे शास्त्र ७६. गार, थंड ७७. शेजारी शेजारी

**उभे शब्द**

१. नावात पैसा असून अत्यंत गरीब २. सोन्याचा धागा ३. शासन कालावधी, कारकीर्द ४. दात ५. सगळीकडे ६. पुन्हा पुन्हा ७. लोटी ८. विद्येचे माहेरघर ९. पद्धतीप्रमाणे १२. कापसाचे बी १४. लडबडणे, चोपडणे १५. वेतन १७. मुलगा (हिंदी) २१. रक्षण करणारा २३. माझे २५. क्रूर मनुष्य २७. साप ३०. मान खाली घातलेला ३१. हाताचा एम भाग ३३. झकास ३४. घाबरलेला, व्याकूळ ३६. अभिनेता ३७. प्रत्येक दिवशी ३८. फळाची पातळ फोड ३९. नाजूक ४१. जुन्या काळचे दंतमंजन ४२. मृत्यू, यम, वेळ ४५. नमनीय ४६. आश्रय, थारा, टेकू ४७. लहान ४९. श्रीविष्णूचे बटुरुप ५०. वर्तुळ ५१. मनाची इच्छा, तरंग ५३. जुगार खेळणारा (हिंदी) ५४. 'मी – हरपून बसले गं' (कवि : सुरेश भट) ५६. थेट, सरळ ५८. रात्रभर ६०. जन्मापासून ६१. बांगड्यांचा व्यवसाय करणारा ६४. एक श्वासरोग ६५. लाडीगोडी, चलाखी ६७. आईची बहीण ६९. द्वाड, हट्टी, खोडकर ७०. चौपट ७३. आजच्या आधीचा दिवस ७४. चतकोर ७५. वेदना, खटका

## शब्दकोडे १९७ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.जादूगर ३.गडद ६.वासलात ९.मावा ११.खबरदारी १३.पदोपदी १४.दशरथ १७.तडकाफडकी १८.कारा २१.रखरख २४.परवानगी २६.मम २८.सट्टा २९.तमासगीर ३०.परोपकार ३१.वाचनालय ३४.समर ३६.टर ३८.विपरीत ४१.गत ४२.चलनवलन ४४.रात ४५.परागंदा ४६.कोरी ४७.काळीज ४८.पारवा ४९.धाम ५१.तळहात ५३.यम ५५.करकरीत ५८.नडणे ६०.खबर ६२.दमट ६४.परवा ६६.पान ६८.सरकार ६९.नवजात ७१.लखलखीत ७३.कलाकार ७५.रीस ७६.डफ ७७.रास ७८.नमन ७९.दीन

**उभे उत्तर**

१.जास्वंद २.गाजर ३.गबरू ४.डर ५.ददात ७.सराफकट्टा ८.तपकीर ९.माप १०.वादी १२.रीड १५.शरीर १६.थकान १९.रागी २०.रममाण २२.खटपट्या २३.खबरबात २४.पळवाट २५.वासना २७.मस २८.सरसरीत ३०.पर ३२.चरचरीत ३३.लहानसहान ३५.मत ३७.काल ३९.पराजय ४०.पारावार ४१.गदाघरी ४३.नकार ४५.परकर ५०.मतपेटी ५२.तडस ५४.मख ५६.कर्जबाजारी ५७.पदरमोड ५९.परका ६१.बशा ६३.टपाल ६४.परतणे ६५.वारकरी ६७.नखरा ६८.सखी ६९.नरम ७०.तसदी ७२.लस ७४.कान

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# ‘ड्रग्ज फ्री नाशिक’ मोहीमेला एक वर्ष पूर्ण

## एमडीवर कारवाईचे केले स्वागत

**नाशिक । प्रतिनिधी**

गेल्या वर्षी शहरातील तरुणाईला व्यसनमुक्त करण्याचे काम 'ड्रग फ्री नाशिक' या मोहिमेच्या माध्यमातून तहेरिके आशिक ए रसूल या कमिटीकडून करण्यात आले होते. या मोहिमेला शुक्रवारी (दि.६) रोजी एक वर्ष पुर्ण झाले. वर्षभरात ही मोहीम सपूर्ण राज्यभरात पोहचली असून मुस्लिम धर्मगुरू मोहम्मद पैगंबरांचे वंशज ऑल इंडिया सुन्नी जामिअतुल उलेमाचे अध्यक्ष हजरत मोईन मिया यांच्याकडून राज्यभरातील विविध जिल्ह्यात जनजागृती व नशाविरोधी कार्यक्रम घेऊन तरुणांना व्यसनमुक्त करण्याचे काम करत आहे. नाशकात आतापर्यंत तीनशेवर तरुण व्यसनमुक्त झाले आहेत. तसेच, शुक्रवारी शहरातील शिंदे गाव येथे पोलिसांकडून करण्यात आलेल्या कारवाईचे 'ड्रग फ्री नाशिक' मोहीम राबवणाऱ्या संस्थांकडून स्वागत करण्यात आले.

राज्यभरातील व्यसनाधीन तरुणाईला सावरण्यासाठी हजरत सय्यद मोईन मिया यांनी तहेरीके आशिक रसून कमिटीमार्फत मौलाना व मस्जिदच्या माध्यमातून 'ड्रग्ज फ्री सोसायटी, ड्रग्ज फ्री नाशिक' मोहीम हाती घेतली आहे. अमली पदार्थांसह तंबाखू व धुम्रपान करणार्या युवकांची संख्या वाढली आहे. फॅशन म्हणून युवक-युवती व्यसन करताना दिसत आहेत. नशेच्या आहारी जावून युवा वर्ग आपले जीवन उदध्वस्त करीत आहेत. यामुळे तहेरीके आशिक ए रसूल या कमिटीकडून नाशिकमध्ये मुस्लिम समाजातील प्रत्येक शाळा-महाविद्यलयात जावून यासंदर्भात जनजागृती केली जात आहे. तसेच, शहरातील प्रत्येक मशिदींचे मुख्य इमाम, शिक्षक, पालक, समाज सुधारक, पत्रकार आणि राज्यकर्ते यांनी अमली पदार्थांपासून तरुण पिढी वाचवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. या मोहिमेअंतर्गत प्रत्येक शुक्रवारी जुम्माच्या नमाजामध्ये नशामुक्तीवर प्रवचनही केले जात आहे. यामुळे या मोहीमेला आता यश मिळू लागले असून तीन महिन्यात तीनशेवर तरुण व्यसनमुक्त झाले असून शहरातील विविध भागांतील ३०० वर तरुणांना मुबई येथिल टिटवाला येथील नशामुक्ती केंद्रात पाठविण्यात आले आहे.



तहेरिके आशिक ए रसूल कमिटीकडून गेल्या वर्षी सुरु करण्यात आलेल्या 'ड्रग फ्री नाशिक' या मोहिमेला काल एक वर्ष पुर्ण झाले आहे. वर्षभरात ही मोहीम सपूर्ण राज्यभरात पोहचली आहे. नाशकात ड्रग्सवर केलेल्या कारवाईचे आम्ही स्वागत करतो.
**- हाफिज समीर कोकणी,** प्रमुख, तहेरिके आशिक ए रसूल कमिटी.

## न्यूज कॉलम

### एकाला मारहाण

**नाशिक ।** पंचवटी क्रांतिनगर पेट्रोलपंपावर झालेल्या मारहाणीत दोघांनी एकाला बेदम मारहाण केली. किरण भडांगे, नीलेश भडांगे अशी संशयितांची नावे आहेत. गजभिये पेट्रोलपंपासमोर फुटपाथवर रात्री दहाच्या सुमारास पंकज सुरेश जाधव (२४, क्रांतीनगर) जात असताना जुन्या वादाच्या कारणावरून भडांगे यांनी जुन्या वादातून शिवीगाळ व दमदाटी करून मारहाण केली. याप्रकरणी पंचवटी पोलिस ठाण्यात गुन्हा करण्यात आला.

# जीव मुठीत धरुन विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

## बांधकाम सुरू असलेल्या इमारतीमध्ये परीक्षा केंद्र







**सिडको । प्रतिनिधी**

नव्याने बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या छताखालीच चित्रकला परीक्षा केंद्र दिल्याने परीक्षा संपेपर्यंत विद्यार्थी व पालक वर्गाचा जीव टांगणीला लागल्याचे दिसून आले. एवढेच नव्हे तर परीक्षा केंद्राचा चुकीचा पत्ता दिल्याने ऐनवेळी पालक व विद्यार्थी वर्गाची चांगलीच धावपळ उडाली. तर उशिरा आलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांशी हुज्जत घातल्याचा प्रकार कला कला संचालनालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या सिडकोतील परीक्षा केंद्रावर दिसून आला. याबाबत पालक व विद्यार्थी वर्गाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र राज्य कला संचालनालय मुंबईच्या वतीने सध्या नशिक शहर व सिडको परिसरातील काहीं शाळांमध्ये परीक्षा केंद्र देण्यात आले आहे. या ठिकाणी शुक्रवार व शनिवार या दोन दिवसात इंटरमीजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा २०२३ घेण्यात येत आहे. यामध्ये अक्षम्य चुका आढळून आल्याने विद्यार्थी व पालक वर्गाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

सिडकोतील मोरवाडी येथील हिंदी माध्यमिक शाळा टी.जे. चव्हाण येथे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र देण्यात आले आहे. या शाळेचे नवीन भले मोठे बांधकाम सुरू आहे. रस्त्यात बांधकाम साहित्य व लोखंडी सळया पडलेल्या आहेत. तर वर बांधकाम सुरू आहे. त्यामुळे इमारतीच्या वरतून खाली वस्तू पडण्याचा धोका येथे दिसून येतो. नेमके याच परिसरातून विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर जाण्याची कसरत करावी लागते. वर बांधकाम व खाली परीक्षा अशी विदारक परिस्थिती या ठिकाणी विद्यार्थ्यांची दिसून येते. परीक्षा संपेपर्यंत विद्यार्थी व पालकांचा जीव टांगणीला असल्याचे बघायला मिळाले. दुर्दैवाने एखाद्या विद्यार्थ्याचे बरे वाईट झाले तर यास जबाबदार कोण? असा प्रश्न देखील यावेळी घाबरलेल्या पालकांनी उपस्थित केला. त्यावर आयोजकांनी व केंद्रप्रमुखांनी वरिष्ठांकडे तक्रार करा, असा अजब सल्ला पालकांना दिला. यासंदर्भात जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रवीण पाटील यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी भ्रमणध्वनी उचलला नाही.

### प्रिंटिंग मिस्टेकने गोंधळ

**विद्यार्थी प्रवेश पत्रावर सुरुवातीला छापून आलेला पत्ता हा हिंदी मध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय, दत्त चौक सिडको, नाशिक, ४२२००९ असा देण्यात आला आहे. तर प्रवेश पत्राच्या खाली हाताने दुरुस्ती करुन टी.जे.चौहान बिटको, हिंदी माध्यमिक विद्यालय, मोरवाडी, नाशिक असा टाकण्यात आला आहे. त्यामुळे पालकांचा चांगलाच गोंधळ उडाला.**

**प्रवेश पत्रावर मागील वर्षाच्या समन्वयकाच्या संपर्क क्रमांकाने गोंधळ प्रवेश पत्रावर समन्वयक म्हणून ज्यांचा संपर्क क्रमांक दिला आहे. तो मागील वर्षाच्या समन्वयकाचा टाकण्यात आला आहे. त्यामुळे ही एक मोठी घोडचूक पालकांना दिसून आली.**

**चित्रकला परीक्षेमध्ये सर्वत्र उदासीनता दिसून येते. कुणीच परिक्षा घ्यायला तयार नाही. केंद्र म्हणून शाळा द्यायला तयार नाही. विद्यार्थी मोठ्या प्रमाणात चित्रकलेच्या परीक्षेला बसलेले आहेत. त्या प्रमाणात शाळांमध्ये जागा नाही. त्यामुळे ही परिस्थिती उद्भवली आहे.**
**- डी.आर. सांगळे,** जिल्हाध्यक्ष, कला शिक्षक संघटना, नाशिक.

# सह्याद्री युवक मंडळ राणेनगरतर्फे सुरू होणार गरबा-दांडीया



**नाशिक । प्रतिनिधी**

पाथर्डी फाटा परिसरातील सह्याद्री युवक मंडळ राणेनगर आणि पाथर्डी पंचक्रोशी कला क्रिडा सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने वासन नगरातील गामणे मैदानावर गरबा दांडीया उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या गरबा उत्सवाच्या कामाचे भूमिपूजन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अशोक सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि भाजपा नेते महेश हिरे यांच्या हस्ते ऑनलाईन श्रीफळ वाढवून करण्यात आले.

गेल्या २८ वर्षांपासून सह्याद्री युवक मंडळ राणेनगर यांच्यावतीने गरबा दांडीया उत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. यावर्षी देखील वासन नगरातील गामणे मैदानावर रविवार दि. १५ ऑक्टोबरपासून गरबा दांडीया उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर गामणे मैदानावर स्टेज भुमीपूजन करण्यात आले. यावेळी भाजप नेते महेश हिरे यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. माजी नगरसेवक सतीश सोनवणे यांनीही यावेळी आयोजकांच्या कार्याचा आढावा घेतला. तसेच माजी सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक सावंत यांनी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले. तर आयोजक अमोल जाधव यांनी कार्यकर्माविषयी भुमिका स्पष्ट केली. यावेळी सुदाम डेमसे, भगवान दोंदे, माजी नगरसेविका संगीता जाधव, राष्ट्रवादी काँग्रेसचे देवळाली विधानसभा अध्यक्ष सोमनाथ बोराडे यांच्यासह माजी नगरसेवक अँड.शाम बडोदे आदीसह एकनाथ नवले, चेतन चुंबळे, आप्पा बाविस्कर, शैलेश कार्ले, सुनिल नवले, सतेज महाजन, सुरेंद्र कोथमिरे, संजय जाधव, कैलास बोराडे, अंकुश भोर, पप्पु दोंदे, शरद घाटे, संदिप दोंदे, निलेश सांगळे, निलेश वर्पे तसेच सह्याद्री युवक मंडळ आणि पाथर्डी पंचक्रोशीतील कला, क्रिडा सांस्कृतिक मंडळाचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रा.डी.एच.शिंदे यांना ‘विद्यावाचस्पती’ पदवी प्रदान

**नाशिक । प्रतिनिधी**

केटीएचएम कॉलेजच्या समाजशास्त्र विभागातील प्रा. दिपक शिंदे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणेकडून मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयात 'विद्यावाचस्पती' ही पदवी प्रदान करण्यात आली.

यासाठीची अंतिम मौखिक परीक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे मंगळवारी श्रुती तांबे (विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग, पुणे) यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठातील समाजशास्त्र विभाग येथे ऑफलाईन पार पडली. या प्रसंगी प्रोफेसर डॉ. आर. बी. पाटील (विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) हे बहिस्थ परीक्षक म्हणून उपस्थित होते. त्यांचा संशोधनाचा विषय नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण महिलांच्या जमीन विषयक मालकीचा समाजशास्त्रीय अभ्यास असा होता. त्यांना प्रोफेसर डॉ. संजय सावळे यांचे मार्गदर्शन लाभले.




त्यांच्या या यशाबद्दल मविप्र सरचिटणीस अँड नितीन ठाकरे, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, चिटणीस दिलीप दळवी, उपसभापती देवराम मोगल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.डी.दरेकर, शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके, डॉ. नितीन जाधव, डॉ. विलास देशमुख यांनी अभिनंदन केले आहे.

## वृंदावननगरला घरफोडी

**नाशिक ।** आडगाव शिवारात जत्रा हॉटेल परिसरात नांदूर लिंक रोडवर प्रांजल सोसायटीत घरफोडी करून चोरट्यांनी पन्नास हजाराचे सोन्या चांदीचे दागिने लंपास केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ३० सप्टेंबरला दुपारी दोनला घरफोडी झाली. याप्रकरणी मयूर दिलीप बागूल यांच्या फिर्यादीवरून आडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० सप्टेंबरला बागूल यांच्या बंद घराच्या दरवाजाची कडीकोयंडा तोडून चोरट्याने घरात प्रवेश करीत ऐवज लंपास केला.

# नाशिक महानगर भाजप मंडल अध्यक्ष घोषित

## अर्धा डझनहून अधिक मंडलाध्यक्षांना पुनश्च संधी

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक महानगर भाजप मंडल अध्यक्ष घोषित करण्यात आले असल्याचे भाजप नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव यांनी प्रसिध्दी पत्रकारद्वारे जाहीर केले आहे. नवीन मंडल अध्यक्षांच्या रचनेत अर्धा डझनहून अधिक मंडल अध्यक्षांना पुन्हा संधी देण्यात आली आहे.

या मंडलाध्यक्षांमध्ये मंडल अध्यक्ष पंचवटी - ज्ञानेश्वर काकड, तपोवन - चंद्रशेखर पंचाक्षरी, नाशिकरोड -शांताराम (जयप्रकाश) घंटे, मध्य - वसंत उशीर, जुने नाशिक - भास्कर घोडेकर, द्वारका - सुनील देसाई, सातपूर - भगवान काकड, सिडको -१- रविंद्र पाटील, सिडको -२ - अविनाश पाटील यांचा समावेश आहे. तसेच नाशिक महानगरातील कार्यकारिणीत उपाध्यक्ष पदावर उपाध्यक्ष - प्रकाश चकोर, प्रशांत कोतकर, डॉ.विनय मोगल, अनिल मटाले, राजेश आढाव, राहुल पवार, धनंजय पुजारी यांचा समावेश आहे. तर चिटणीस - ड.परमानंद पाटील, शरद फडोळ, महेंद्र पाटील, यशवंत पवार, बबन ढगे, संतोष भोर, मंगेश पगार, अमोल गांगुर्डे हे आहेत.

मंडल अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांचे नावे निश्चित करतांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष आ.चंदशेखर बावनकुळे, ना.गिरीश महाजन, प्रदेश महामंत्री विजय चौधरी, संघटन मंत्री रवी अनासपुरे, आ.राहुल ढिकले, आ.देवायानी फरांदे, आ.सीमा हिरे, प्रदेश मुख्य सहप्रवक्ते अजित चव्हाण, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, प्रदिप पेशकार, बाळासाहेब सानप, विजय साने, सतिश कुलकर्णी आदी वरिष्ठ नेत्यांची चर्चा व विचार विनिमय करून निश्चित करण्यात आली आहे. असे शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांनी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# लासलगाव भाजपच्या वतीने आयुष्मान कार्ड जनजागृती मोहीम

**लासलगाव । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत आयुष्मान भारत गोल्डन कार्ड ज्यात पाच लाखापर्यंत आरोग्य सुविधा मोफत उपचार केले जाणार असून याची जनजागृती मोहीम तसेच आयुष्मान भारत गोल्डन कार्ड काढण्याची सुरुवात भाजपा नाशिक जिल्हा सरचिटणीस महिला मोर्चा स्मिता कुलकर्णी यांच्या नेतृत्वात आशा सेविका अर्चना सोनवणे,अनिता भागवत यांच्या मार्गदर्शनात अहिल्यादेवी चौक ग्रामपंचायत हॉल या ठिकाणी करण्यात आली

या कार्यक्रमास भाजपा लासलगाव मंडल अध्यक्ष निलेश सालकाडे ग्रामपंचायत सदस्या ज्योती निकम,भाजपचे जेष्ठ पदाधिकारी नितीन शर्मा,धनंजय गांगुर्डे प्रमुख



पाहुणे म्हणून उपस्थित होते.उपस्थित प्रमुख मान्यवरांनी आयुष्मान भारत गोल्डन कार्ड चे महत्व तसेच त्यामध्ये मिळणाऱ्या आरोग्य सुविधा,सरल एप आदी सुविधांची माहिती दिली. आयुष्मान कार्ड काढण्यासाठी रेशन कार्ड ऑनलाईन असणे गरजेचे असून रोज दुपारी १ ते ३ या वेळेत ग्रामपंचायत हॉल किल्ल्यामागे सदर कार्ड काढून देण्यात येईल त्यासाठी सदर व्यक्ती तसेच मोबाईल नंबर आधारला लिंक असणे गरजेचे असल्याचे स्मिता कुलकर्णी यांनी सांगितले. या वेळी स्मिता कुलकर्णी,अर्चना सोनवणे,अनिता भागवत मैत्री ग्रुपच्या सोनाली कर्डिले,शैला सोनवणे,आरती सोनवणे, शोभा कर्पे,मंगला शिरसाठ, मुक्ताबाई शिरसाट, सगुना सोनवणे, स्वाती जोशी, अक्षदा जोशी, श्वेता आब्बड, मनीषा जाधव, अनिता कहाणे,शांताबाई देवढे, सुमन शिरसाट, जयश्री भागवत, माया डुंबरे, सुनंदा आहे, रेखा रायजादे, सुचित्रा रायजादे, सुमन शिरसाट, खुशी आब्बड, वृषाली देवढे,सविता जोशी,भानुदास जोशी, राधाकृष्ण देवढे, केशव भागवत, श्लोक कर्डीले व परिसरातील महिला व बांधव उपस्थित

# शूरवीर जीवा महाले जयंती सोहळ्यास हजारो नाभिक बांधव सहभागी होणार

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिक जिल्हा नाभिक समाज ,नाभिक युवासेना तसेच जीवा महाला उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष रोशन शिंदे यांच्या पुढाकाराने नाशिक येथे येत्या ९ ऑक्टोबर रोजी शिवछत्रपतींचे विश्वासू अंगरक्षक शूरवीर जीवा महाला यांचा जन्मोत्सव साजरा होत आहे या सोहळ्यासाठी नाशिक जिल्ह्यातून हजारो नाभिक बांधव सहभागी होणार असल्याची माहिती दिंडोरी ग्रामीण जिल्हाध्यक्ष अनिल वाघ यांनी दिली.

नाशिक शहरात जीवा महाले जयंती निमित्त भव्य शोभायात्रा दुपारी ४ वाजता वाकडी बारव,द्वारका येथून मेन रोड, रविवार कारंजा व शिवछत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करून मिरवणूक समाप्त होईल व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन खांदवे सभागृह या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे.

तरी या सर्व कार्यक्रमास नाशिक जिल्ह्यातील व नाशिक जिल्हा ग्रामीण भागातील सर्व नाभिक बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन नाशिक दिंडोरी लोकसभा अध्यक्ष अनिल वाघ व नाभिक समाज पदाधिकाऱ्यांनी यांनी केले आहे

**न्यूज कॉलम**

### ॲड.रेवती सोनवणे यांचे व्याख्यान

धुळे । महात्मा फुले विद्याप्रसारक संस्थेचे श्री. तु. ता. खलाणे महाजन हायस्कूल व कै. बापूसाहेब ग.द. माळी गुरुजी कनिष्ठ महाविद्यालयात सायबरतज्ज्ञ ॲड. रेवती सोनवणे यांचे सायबर सुरक्षा विषयावर व्याख्यान झाले. विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षित कसे राहावे, समाजमाध्यमांचा वापर कसा करावा, ऑनलाइन बुलिंग, गेमिंग, फिशिंग यांना बळी कसे पडू नये यासाठी ॲड. सोनवणे यांनी स्टॉप थिंक ॲन्ड ॲक्ट सेल्फी हा मोलाचा संदेश विद्यार्थ्यांना दिला. मोबाईलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामाची विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली, तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक व्ही. बी. पाटील, उपप्राचार्य आर. आर. मानकर, प्रा. सुषमा सावळे, प्रा. वीणा महाजन, प्रा. वंदना आढावे सीमा सोनवणे, राहुल महाजन, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### क्रीडा संकुल जवळून दुचाकीची चोरी

शिंदखेडा । जिल्हा क्रीडा संकुल येथील पार्किंगमध्ये लावलेली एमएच १८ एई ७९९४ क्रमांकाची १० हजार रुपयांची दुचाकी चोरट्याने लांबविली. याप्रकरणी पांडुरंग विलास पाटील यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल झाला.

# दरोडेखोरांच्या टोळीमधील संशयित २ जणांना बेड्या; २ दुचाकी जप्त

**धुळे । प्रतिनिधी**



छडवेल कोर्डे (ता. साक्री) येथे स्वस्तातील तांब्याचे तारेचे आमिष दाखवून इंदूर (मध्य प्रदेश) व मुंब्रा (जि. ठाणे) येथील व्यापाऱ्यांना लुटणाऱ्या जामदा येथील टोळीचा एलसीबीने अवघ्या चोवीस तासांत पर्दाफाश केला. टोळीतील दोघांच्या मुसक्या आवळल्या.

या कारवाईत गुन्ह्यातील दोन दुचाकीही जप्त केल्या. टोळीत दहा जणांचा समावेश आहे. त्यातील सात संशयितांची नावे निष्पन्न झाली आहेत. जामदा (ता. साक्री) येथील एका टोळीने फेसबुकवरून मुखधूम मेहबूब खान (रा. दोस्ती प्लॅनेट, एल मोर सी खोली क्र. २३०२, शिळ फाटा, मुंब्रा, जि. ठाणे) या व्यापाऱ्याला स्वस्तात तांब्याची तार देण्याचे आमिष दाखवून गावात बोलविले. त्यानुसार मखधूम खान ४ ऑक्टोबरला सकाळी साडेदहाच्या सुमारास मुलगा आवेश व त्यांचा मित्र अमित कुमार जैन (रा. इंदूर, मध्य प्रदेश) यांना सोबत घेत छडवेल कोर्डे येथे आले. तांब्याची तार दाखविण्याच्या बहाण्याने काहींनी त्यांना पेटले गावातील पवनचक्कीजवळ नेले. तेथे आधीच दबा धरून बसलेल्या आठ ते दहा जणांनी मुखधूम मेहबूब खान यांच्याकडील तीन मोबाईल व रोकड असा ३८ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल बळजबरीने हिसकावून घेत पोबारा केला. या प्रकरणी खान यांच्या फिर्यादीवरून गुरुवारी (ता. ५) निजामपूर पोलिस ठाण्यात दरोड्याच्या गुन्ह्याची नोंद झाली.

दरम्यान, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.बी.जी.शेखर पाटील हे धुळे जिल्ह्याच्या वार्षिक तपासणी दौर्यानिमित्त आले असता त्यांनी या गंभीर गुन्ह्याची उकल करण्याचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड व अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांना दिले. त्यानुसार पथकास घटनास्थळी पाठवून फिर्यादीकडे अधिक चौकशी करण्यात आली. त्यानुसार निलेश जहागिर चव्हाण व उज्वल संतू भोसले रा.जामदा यांना फिर्यादीने केलेल्या वर्णनावरून ताब्यात घेण्यात आले. त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी सुरज चव्हाण, भोलाराम भोसले, पी.के. पाटील, जॉनी भोसले, प्रदीप चव्हाण सर्व रा.जामदा यांची नावे सांगितली. व या सर्वांनी मिळून गुन्हा केल्याची कबूल केले. ताब्यात घेतलेल्या दोघा दरोडेखोरांकडून गुन्ह्यात वापरलेल्या दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या. अधिक तपासात निलेश चव्हाण, जॉनी भोसले व प्रदीप चव्हाण या तिघांवर निजामपूरसह सोनगीर पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले.

नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. बी. जी. शेखर-पाटील यांची जिल्हा वार्षिक तपासणी सुरू असताना या गुन्ह्याची उकल करण्याचा आदेश त्यांनी पोलिस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलिस अधीक्षक किशोर काळे यांना दिला. तपासात एलसीबीने संशयित नीलेश जहागीर चव्हाण व उज्वल संतू भोसले (रा. जामदा) यांना ताब्यात घेतले. अधिक चौकशीत त्यांनी सूरज चव्हाण, भोलाराम भोसले, पी. के. पाटील, जॉनी भोसले, प्रदीप चव्हाण (सर्व रा. जामदा) यांची नावे सांगितली. सर्वांनी मिळून गुन्हा केल्याची दोघांनी कबुली दिली. तपासात नीलेश चव्हाण, जॉनी भोसले व प्रदीप चव्हाण या तिघांवर निजामपूरसह सोनगीर (ता. धुळे) पोलिस ठाण्यात गंभीर गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले. वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पोलिस उपअधीक्षक साजन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे निरीक्षक हेमंत पाटील, बाळासाहेब सूर्यवंशी, संजय पाटील, हेमंत बोरसे, संदीप पाटील, योगेश चव्हाण, पंकज खैरमोडे, रविकिरण राठोड, मायूस सोनवणे, हर्शल चौधरी, गुणवंत पाटील, राजू गिते यांच्या पथकाने ही कारवाई केली.

**मृत्यूचे कारण गुलदस्त्यात**

**दरोडेखोरांनी लुटल्याची घटना घडल्यानंतर इंदूर (मध्य प्रदेश) येथील व्यापारी अमित कुमार जैन बेशुद्धावस्थेत आढळले होते. त्यांना जैताणे ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. त्यांच्या मृत्यूचे कारण समजले नाही, अशी नोंद निजामपूर पोलिस दप्तरी आहे.**

# मानव उत्थान सेवा समितीतर्फे स्वच्छता अभियान



**नाशिक । प्रतिनिधी**

सदगुरूदेव श्री सतपालजी महाराज प्रणीत मानव उत्थान सेवा समितीच्या वतीने रविवारी उंटवाडीजवळील कालिका पार्क येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. मानवधर्म प्रेमी, मानव सेवा दल आणि युवामंच्या स्वयंसेवकांनी त्यामध्ये उत्सफुर्तपणे सहभाग नोंदवित परिसराची साफ सफाई केली.

मानव उत्थान सेवा समितीच्या तपोवनातील सर्व धर्म मंदीर, सातपूर गावातील हंस ध्यान मंदीर आणि नाशिक - पुणे रोडवरील श्री हंस कल्याण धाम आश्रमाच्या वतीने रविवारी सिडको परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. महापालिकेच्या सहकार्याने झालेल्या या अभियानाचा शुभारंभ श्री हंस कल्याण धाम आश्रमाच्या प्रबंधक साध्वी हिराजी, साध्वी पंकजाजी, साध्वी मिथिलेशजी, माजी नगरसेवक सुधाकर बडगुजर, माजी नगरसेविका भाग्यश्री ढोमसे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. कालिका पार्क येथील पाटीलनगर मैदानासमोरील परिसर, सरस्वती विद्यालय, पाटील हॉस्पिटलजवळील परिसर यावेळी स्वच्छ करण्यात आला. यामध्ये मानव धर्म प्रेमी, मानव सेवा दल आणि युवादलाचे स्वयंसेवक सहभागी झाले. अल्पोपहाराने या अभियानाचा समारोप झाला.

# डॉ.घोगरे विज्ञान महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबीर

**धुळे । प्रतिनिधी**



श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे डॉ.पा.रा.घोगरे विज्ञान महाविद्यालयातील गणित विभागाच्यावतीने चिंचवार ता.धुळे येथे एकदिवशीय स्वच्छता व श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या श्रमसंस्कार शिबीरात एकूण ६० विद्यार्थी -विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता. यावेळी चिंचवार गावातील विविध रस्ते,चौक अशा विविध ठिकाणी स्वच्छता केली. शिबीरात ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, व सायबर क्राईमबाबत जनजागृती इत्यादी विषयांचाही कृतीशिल कार्यक्रमात अर्तभाव होता. प्राचार्य डॉ.एम.व्ही. पाटील, उपप्राचार्य के.एम.बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रमसंस्कार शिबीर घेण्यात आले. यावेळी प्रा.एम.डी. सुर्यवंशी, प्रा.अनिल एस.पाटील, प्रा.रितेश जाधव, प्रा.दिपिका पाटील, प्रा.योगेश चव्हाण, प्रा.ललित पवार, प्रा.जगदिश पाटील, प्रा.हेमांगी चौधरी, डॉ. पी.एन.महाले, भगवान मोरे, अक्षय साळुंखे, जिभाऊ सर, विलास पाटील यांच्यासह चिंचवार ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व पदाधिकारी उपस्थित होते.चिंचवार ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सोमनाथ पाटील यांच्या सहकार्याने शिबीर यशस्वी पार पडले.

# आर. सी. पटेल आय. एम. आर. डी. परिसंस्था व शिरपूर वरवाडे नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने नदीपात्र साफसफाई



**शिरपूर । प्रतिनिधी**

शासना मार्फत माझी वसुंधरा अभियान ची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून आर. सी. पटेल आय. एम. आर. डी. परिसंस्था शिरपूर व शिरपूर वरवाडे नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने सामंजस्य करार अंतर्गत शिरपूर शहरातील अरुणावती नदी पात्र साफसफाई १५ डिसेंबर शुक्रवार रोजी सकाळी ८ वाजता करण्यात आली. सदर कार्यक्रम अंतर्गत श्रमदान, साफसफाई, स्वच्छता शपथ, इ. विविध उपक्रम राबवून जनजागृती करण्यात आली.

शिरपूर वरवाडे नगरपरिषद मुख्याधिकारी तुषार नेरकर यांच्या प्रमुख उपस्थिती राबविण्यात आला. पर्यावरण आणि हवामान बदल विभाग महाराष्ट्र शासन अंतर्गत संपूर्ण राज्यभरात माझी वसुंधरा अभियानची अंमलबजावणी सुरु करण्यात आली असून आय. एम. आर. डी. परिसंस्था, शिरपूर रा.से.यो. एकक मार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिरपूर शहरालगत असलेल्या अरुणावती नदी पात्र साफसफाई कार्यक्रम महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक, नगरपरिषदेचे अधिकारी कर्मचारी, पदाधिकारी, नागरिक व, पर्यावरण दूत यांच्या सहभागाने घेण्यात आला. सर्वांना हरित शपथ देऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी नदीपात्रात असलेले झाडे-झुडपे तोडून साफसफाई, प्लास्टीक कचरा संकलण करण्यात आले. तसेच नदी पात्रात वाहून आलेले प्लास्टिक, कपडे, भंगलेल्या व विसर्जीत मूर्त्या व इतर घाण संकलित करून कचरा संकलन वाहनात टाकण्यात आले.तसेच विल्हेवाट लावण्यासाठी पाठविण्यात आले. या उपक्रमात राष्ट्रीये सेवा योजनेच्या ४५ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला. शिरपूर वरवाडे नगरपरिषद लोकनियुक्त माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन पटेल, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगराध्यक्षा संगीताताई देवरे, आय.एम.आर.डी. परिसंस्था संचालिका डॉ. वैशाली पाटील, सहसंचालक प्रा. मनोज बेहेरे, आय.क्यु.ए.सी. को-ऑर्डिनेटर डॉ. मनोज पटेल, पदवी विभागप्रमुख डॉ.तुषार पटेल, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी योगेश सी. शेठिया, विठ्ठल एम.पाटील, विजय आर. गर्गे , सौ.मोनाली एस.किरंगे यांनी संयोजन केले.



# अनुदानित आश्रमशाळा जळोद येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी

**तऱ्हाडी । प्रतिनिधी**

अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा जळोद येथे महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे पदाधिकारी रवींद्र शेलार व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक सुजित पाडवी सर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते .

वकृत्व स्पर्धेतील सर्व विजेत्यांचे मुख्याध्यापक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. शेवटी अध्यक्ष भाषण माध्यमिक मुख्याध्यापक सुजित पाडवी सरांनी केले सुजित पाडवी सरांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे दुसरे राष्ट्रपती लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राथमिक शिक्षक रवींद्र भावसार सरांनी केले तर प्रस्ताविक माध्यमिक शिक्षक पंडित बोरसे सरांनी केले. आभार प्रदर्शन प्राथमिक शिक्षिका जयमाला पाटील यांनी केले कार्यक्रमाच्या वेळी सर्व विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते .

# पितृपक्ष पंधरवाडा दुष्काळाच्या सावटाखाली

**वरुळ । प्रतिनिधी**

गणपती उत्सवानंतर दुष्काळाच्या सावटाखाली पितृपक्ष पंधरवडा सुरू झाला असुन , घरातील मृत व्यक्तीना पंधरवाड्यात त्यांच्या मृत्युच्या दिवसाच्या तिथिचा अभ्यास करून पितृपंधरवाड्यातील तिथी निवडली जाते. एकंदरीत मृत व्यक्तीच्या मृत्यू समयीच्या घटीकेचा विचार करून पितरांचा विधी त्या त्या तिथिला करायचा असतो. पितरांच्या दिवशी कावळ्याला विशेष महत्व असते.मनुष्य धाव धाव धावतो, काबाड कष्ट करतो, जमवलेल्या धनसंचयातुन स्वर्गवासी वाड वडीलांचेही काही घेणे असते,नाही तर पुढे याच व्यक्ती कडून कुटुंबाना त्रास होतो,अशी श्रद्धा आहे आपल्या पितरांचा सकारात्मक आशिर्वाद मिळावा म्हणून करावयाचा विधी म्हणजे पितरं होय. पुर्वी पितरांसाठी नातलग, गावातील व्यक्ती, शेजारील व्यक्तींना विशेष करून बोलविले जात होते,

यावर्षी मात्र दुष्काळाच्या सावटाखाली पितृपक्ष पंधरवडा सुरू झाल्याने खरिपातील पिके पावसाअभावी शेतकऱ्यांच्या हातातून गेल्याने तसेच काबाड कष्ट करून पिकवलेल्या शेत मालाला भाव नसल्याने घरातील व्यक्तींच्या उपस्थितीत पितृपक्ष पंधरवाडा सुरू झाला आहे सध्या पितृपंधरवडा मध्यावर आहे, सर्वपित्री अमावस्याला पितृ पंधरवडा समाप्त होत असला तरी या पंधरवड्यात ठिकठिकाणी पूर्वीची दिसणारी धांदल आता दिसेनाशी झाली आहे, इतकेच काय तर नेवैद्य काढून घरावर बराच वेळ काव...काव..चा गजर केल्यावरही काव काव आवाज ऐकण्यासाठी नागरिकांना वाट पाहावी लागत आहे . ऐरवी पितृ पंधरवाडा म्हटला की ग्रामीण भागात ह्या पंधरा दिवसांत एकच लगबग असायची, घरोघरी जेवणाची पंधरा दिवस घरी चूल पेटवायची गरज भासत नसे,आज यांच्या इथे तर उद्या त्यांच्या इथे सारखे जेवणावळी असायची तर पित्र असलेल्या घरी हमखास ५० ते १०० लोकांना आमंत्रण असायचे भल्या पहाटेपासून महिला मंडळाचे स्वयंपाक करण्याची एकच धांदल चालायची ,सायंकाळपर्यंत भोजनाच्या पंक्ती चालायच्या वरण, भात ,पोळी ,आमटी, वड्या, खिर, पापड,वगैरे या काळाच्या ओघात पितृपंधरवडा झगमगाटात मागे पडला आहे. विभक्त कुटुंब पद्धतीला आता पितृ पक्षाना जेवणावळीना घरघर लागली आहे. फक्त एक पितर जेऊ घालण्यावरच भर दिला जात आहे. मोबाईल मुळे पक्षाच्या प्रजनन क्षमतेवरही परिणाम झाला, यांना इतर पक्षाप्रमाणे कावळ्याची संख्याही झपाट्याने कमी होत आहे ,पितृपक्षात नैवेद्याला शिवण्याचा मान कावळ्याला असायचा ,त्यामुळे या दिवसात कावळ्या या पक्षला अन्यन्य साधारण महत्व आहे.१४ तारखेला सर्वपित्री अमावस्या असल्याने उरलेसुरले सर्व पितरं या दिवशी असतात ,त्यामुळे या दिवशी मोठ्या प्रमाणात पितरांची गर्दी असते. या पक्षाच्या प्रजाती नष्ट होत आहेत, वातावरणातील प्रदूषण वाढले आहे,कावळा हा पक्षी गावा शेजारी चिंच ,आंबा ,बोरी या झाडावर व इतर झाडावर आपले घरटे करत असत,घरा भोवताली झाडे व गाव शेजारील झाडे तोडल्या गेल्याने त्यांचा निवारा कमी झाल्याने कावळा या पक्षाची संख्या कमी होत आहे.

### जमावबंदी आदेश धुळे जिल्ह्यात जारी

धुळे । जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी नितीन गावंडे यांनी तरतुदीनुसार १२ ऑक्टोबरला मध्यरात्री बारापर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे. तो आदेश लग्नकार्य, मिरवणुका, तालुका आठवडेबाजार किंवा अंत्ययात्रेच्या जमावास लागू राहणार नाही. हा आदेश पोलिस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणुका काढण्यास रीतसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नसेल. आदेशाचा भंग करणाऱ्याविरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद आहे.

# काँग्रेसची नाशिकला सोमवारी संघनात्मक आढावा बैठक : पानगव्हाणे

**धुळे । प्रतिनिधी**



काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी महाराष्ट्र काँग्रेसतर्फे विभागनिहाय बैठका घेतल्या जात आहे. त्याअनुषंगाने दि.९ ऑक्टोंबर रोजी नाशिक येथे या बैठकीला धुळे शहर व जिल्हयातील पदाधिकार्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन काँग्रेसचे धुळे जिल्हा निरीक्षक राजाराम पानगव्हाणे यांनी काँग्रेस भवन येथे झालेल्या बैठकित केले.

दि. ६ ऑक्टोंबर रोजी दुपारी १ वाजता धुळे येथील काँग्रेस भवनात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे शहर व जिल्हा काँग्रेस पदाधिकार्यांच्या आढावा बैठकिचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी धुळे जिल्हयातील काँग्रेस पदाधिकार्यांकडून आपापल्या तालुक्यातील काँग्रेस पक्षाच्या कामाकाजाबाबत आढावा घेण्यात आला. बैठकित बुथनिहाय कमिटी, गटप्रमुख यादी, तसेच काँग्रेस पक्षातर्फे जिल्हयात घेतलेले विविध कार्यक्रम, जनसंवाद यात्रेचा आढावा याची माहिती देण्यात आली.

याप्रसंगी काँग्रेसचे धुळे जिल्हा निरीक्षक राजाराम पानगव्हाणे यांनी बोलतांना सांगितले कि, धुळे लोकसभा मतदासंघाची मजबुत बांधणीसाठी काँग्रेस पदाधिकार्यांनी एकदिलाने काम केले पाहिजे,येणार्या निवडणूकीत काँग्रेसचाच खासदार निवडून येणार असल्याने कार्यकर्त्यांनी गाफील न राहता जनतेमध्ये गेले पाहिजे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले, विधीमंडळ पक्षनेता आ.बाळासाहेब थोरात,प्रदेश कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील,कार्याध्यक्ष कु.प्रणिती शिंदे, माजी मंत्री के.सी.पाडवी, राजु वाघमारे यांच्या उपस्थितीत दि.९ ऑक्टोंबर रोजी नाशिक येथे काँग्रेस पक्षाची विभागाची जिल्हानिहाय आढावा बैठक होणार आहे. या बैठकीला उपस्थित राहण्याचे आवाहन पानगव्हाणे यांनी केले.यावेळी धुळे शहर काँग्रेस निरीक्षक हेमंत ओगले,जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर,शहराध्यक्ष डॉ.अनिल भामरे,काँग्रेस तालुकाध्यक्ष डॉ. दरबारसिंग गिरासे, माजी पं.स.सदस्य पढरीनाथ पाटील,शिरपुर तालुकाध्यक्ष मनोहर पाटील,साक्री तालुकाध्यक्ष भानुदास गांगुर्डे आदींनी मनोगत व्यक्त केले. जिल्हा आढावा बैठकीला काँग्रेसचे धुळे जिल्हा शहर निरीक्षक हेमंत ओगले,काँग्रेस जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर, बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील, जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल भामरे, काँग्रेसचे धुळे तालुका अध्यक्ष डॉ. दरबारसिंग गिरासे, महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष गायत्री जयस्वाल, माजी पंचायत समिती सभापती भगवान गर्दे, बाजार समितीचे माजी सभापती गुलाबराव कोतेकर, खरेदी विक्री संघाचे चेअरमन लहू पाटील, शिरपूर तालुका अध्यक्ष मनोहर पाटील, आसिफ खान, मोहन पाटील, मा. पंचायत समिती सदस्य पंढरीनाथ पाटील, बाजार समितीचे संचालक एन.डी. पाटील, साक्री येथील विश्वास बागुल,सागर देसले,संदीप पाटील,निंबा भोये आदी उपस्थित होते.

# शिरपूर विकास सोसायटी चेअरमनपदी सतिष पाटील व व्हा. चेअरमनपदी गणपत धनगर

**शिरपूर । प्रतिनिधी**



माजीमंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिरामदादा पावरा, प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणीचे चेअरमन भूपेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची निवडणुक ४ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी ११ वाजता निवडणूक अधिकारी प्रकाश वाघ यांच्या अध्यक्षतेखाली बिनविरोध झाली.

माजी नगराध्यक्ष प्रभाकरराव चव्हाण व माजी नगरसेवक मोहन हुलेसिंग पाटील यांनी या निवडणुकीची जबाबदारी पार पाडली. नवनिर्वाचित चेअरमन सतिष काळू पाटील व व्हाईस चेअरमन गणपत खुशाल धनगर यांचा सत्कार माजी नगराध्यक्ष प्रभाकरराव चव्हाण, माजी नगरसेवक मोहन हुलेसिंग पाटील, माजी चेअरमन सोनू शिकारी सोनार, महेश भिलेसिंग राजपुत, उत्तमराव हिरामण माळी, संतोष महारु माळी, प्रकाश महारु चौधरी, चावदस मोतीराम चांभार, सुरेश अमृतलाल माहेश्वरी, सविताबाई पदमाकर देशमुख, सुनंदाबाई संतोष चौधरी या सर्व संचालकांच्या हस्ते करण्यात आला.सोसायटी मॅनेजर सुनिल कलाल, चंद्रमान माळी यांचे सहकार्य लाभले.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र

रविवार, दि. ८ ऑक्टोबर २०२३ ५

# सप्तशृंगी देवी तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला लवकरच मंजुरी

## उपमुख्यमंत्री अजित पवारांची नाशिकमध्ये मोठी घोषणा









नाशिक ।

नाशिकसह राज्यभरात भाविक सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी येत असतात. भाविकांच्या सोयी सुविधांसाठी काम करणे महत्वाचे आहे. म्हणून श्री सप्तशृंगी देवी संस्थानच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला लवकरच मंजुरी दिली जाईल. येत्या सोमवारी याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत बैठक बोलवण्यात आली आहे. या बैठकीत सप्तशृंगी देवी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी ८१ कोटी ८६ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात येईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नाशिकमध्ये केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे नाशिक दौऱ्यावर असून कळवण शहरात शेतकरी सन्मान मेळाव्यात ते बोलत होते. कळवणला येण्यापूर्वी अजित दादांनी सप्तशृंगी गडावर जात सप्तशृंगी देवीचे दर्शन घेतले. यानंतर ते कळवणला रवाना झाले होते. येथील मेळाव्यात बोलताना त्यांनी सप्तशृंगी तीर्थक्षेत्र विकास आराखड्याबाबत महत्वपूर्ण घोषणा केली आहे. यानंतर अजित पवारांनी सप्तशृंगी गडावर जात आदिशक्ती सप्तशृंगी मातेचे दर्शन घेत मातेच्या चरणी लीन झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी त्यांच्या डोक्यावर टोपी, अंगावर पिवळी शाल, हाती सप्तशृंगी देवीचा फोटो होता. तसेच सप्तशृंगी देवीची पूजा करत अजितदादांनी सप्तशृंगी देवीकडे नेमकं काय मागितलं? याची चर्चा आता सुरु झाली आहे. एकीकडे राष्ट्रवादीत दोन गट पडल्यानंतर चिन्हावरून निवडणूक आयोगात सुनावणी सुरु आहे. तर दुसरीकडे मुख्यमंत्री बदलाबाबतच्या चर्चांना उधाण आले आहे. तसेच टोमॅटोला भाव नसल्याने शेतकरी रस्त्यावर टोमॅटो फेकत आहेत. त्यामुळे या सगळ्या घडामोडींतून राज्यात सुख, शांती राहू दे अशीच प्रार्थना अजित पवार यांनी केली असावी, अशी शक्यता व्यक्त होत आहे. तसेच यावेळी सप्तशृंगी गडावर अजित पवार यांना राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून सप्तशृंगी देवीची प्रतिमा भेट देण्यात आली. तसेच सप्तशृंगी गडावर अजित पवार यांचे जल्लोषात स्वागत देखील करण्यात केले. दरम्यान, याप्रसंगी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, माजी खासदार तथा राष्ट्रवादी पक्षाचे मुंबई अध्यक्ष समीर भुजबळ, दिंडोरीचे आमदार तथा विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती देविदास पिंगळे, निफाडचे आमदार दिलीप बनकर कळवणचे आमदार नितीन पवार यांच्यासह आदी नेते उपस्थित होते.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# भाजप दिव्यांग विकास आघाडीतर्फे 'मेरी माटी, मेरा देश' अभियान

## बाळासाहेब घुगे यांच्या कार्याचे मान्यवरांनी केले कौतुक


















नाशिक । भाजप दिव्यांग विकास आघाडीच्या वतीने 'मेरी माटी, मेरा देश' व 'घर चलो अभियान' काल राबविण्यात आले. प्रभाग क्रमांक ३८ मध्ये भाजप दिव्यांग विकास आघाडीचे प्रदेशाध्यक्ष जयसिंगराव चव्हाण यांनी व्हील चेअरवरून स्वतः घरोघरी जात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आजपर्यंत केलेल्या कामाचे पत्रके वाटप करत संवाद साधला. यावेळी चव्हाण यांचे परिसरातील नागरिकांकडून उस्फुर्त स्वागत करण्यात आले. यावेळी प्रभागातील सर्व महिलांनी 'मेरी माटी मेरा देश' या उपक्रमात प्रत्येक घरातून मुठभर माती देण्यात आली. दरम्यान जयसिंगराव चव्हाण यांचे घरोघरी स्वागत करत महिलांनी औक्षण केले. तत्पूर्वी भाजप दिव्यांग विकास आघाडीचे प्रदेशाध्यक्ष जयसिंगराव चव्हाण यांचे पाथर्डी फाटा येथे दिव्यांग विकास आघाडीचे बाळासाहेब घुगे यांनी स्वागत केले. यावेळी कार्यक्रमाला आ. सीमा हिरे, भाजप शहर अध्यक्ष प्रशांत जाधव, दिव्यांग आघाडीचे संघटक मंत्री काकासाहेब दीक्षित, मारुती मुंडे, माजी नगरसेविका छाया देवांग, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्ष सोनाली ठाकरे, रेश्मी हिरे-बेडाळे, जान्हवी बिरारी, मंडल अध्यक्ष रवी पाटील, प्रविण मोरे, उत्तम पिंटू काळे, जिल्हा अध्यक्ष हेमकांत शिंदे, दिव्यांग आघाडीचे जिल्हाध्यक्ष गोटीराम सूर्यवंशी, शहर अध्यक्ष विनायक कस्तुरे, न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा यमुनाताई घुगे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते.